# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०३/२०१८

**१) संगनमत करुन विवाहीतेस शारीरिक व मानसिक त्रास देवुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक ०६/०३/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान ते २५/०३/०२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा पती असुन आरोपी क्र. २+३ सासु, सासरे, व आरोपी क्र. ४+५ नंनद असुन फिर्यादीचे लग्न आरोपी क्र. १ सोबत सन २०१६ मध्ये जाती रिवाजा प्रमाणे झाले आहे. तेव्हा पासुन आरोपी हे फिर्यादीस माहेरुन पैसे आण? म्हणुन शारीरिक व मानसिक त्रास देत असतात, यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस वांझोटी अशा शब्दात शिवीगाळ करुन माहेरुन पैसे आणले नाही म्हणुन केस पकडुन मारपीट केले फिर्यादीची आई भांडण सोडविण्यास आली असता तीला मारपीट केले व पुन्हा मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट व युवा महिला व मुलीकरीता सहायता कक्ष अधिकारी भंडारा यांचे लेखी अहवाला वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२)बिना परवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक २६/०३/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील ट्रॅक्टर चा चालक व दोन्ही टिप्पर चे चालक यांनी मालक यांचे सांगण्या वरुन यनोळा रेती घाटा वरुन बिना परवाना ९ ब्रास रेती किंमती १८,०००/–रु. ची चोरीने घेवुन जातांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ढाकणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,१०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ढाकणे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) क्षुल्लक कारणावरून भांडण करून आपखुशीने दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक २४/०३/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी याने काटयाचा वॉल कंपाऊड वरून भांडण करून लोखंडी बर्शीने डाव्या पायाचे मागील बाजुस आपखुसीने दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी भावीक बळीराम खोब्रागडे वय ३८ वर्ष रा कन्हाळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**४) हाताचा धक्का मारून हातातील फॉयटरने दात पाडुन जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक २५/०३/२०१८ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी निलेश भैय्याजी ठाकरे वय २९ वर्ष रा. डॉ. मुखर्जी वार्ड भंडारा हा व जखमी योगेश विठ्ठल गजभिये वय १७ वर्ष, रा. देशबंधु वार्ड भंडारा, संजय तेजराम शेंडे वय १९ वर्ष रा. काझी नगर भंडारा हे राम नवमी शोभा यात्री रॅली मध्ये पायदळ जात असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन राजीव गांधी चौकाचे अगोदर युनियन बॅकेच्या समोर रस्त्यावर फिर्यादी व फिर्यादीचे मित्रास हाताचा धक्का मारून त्याचे हातातील फॉयटरने जखमी योगेश याचे तोंडावर मारुन त्याचे दात पाडले व जखमी संजय व फिर्यादी यास पोटावर धारदार वस्तुने मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २६/०३/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही खाम तलाव चौक भंडारा येथे दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने व वैदयकीय रिपोर्ट वरून सरतर्फे फिर्यादी सफौ. तिवारी वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा--या जाणा--या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :--**

दिनांक २६/०३/२०१८ चे १८.४५ ते १९. १५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो बावणकर चौक तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशी उभी करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गुल्हाणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गुल्हाणे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**७) इसमाचा मृत्यु :--**

दिंनाक २५/०३/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील मृतक प्रदीप शत्रुघन नागदेवे वय ५४ वर्ष, रा. निलागोंदी यास त्याचे नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने पोस्टे साकोली येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागद पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. टेंभुर्णे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत.

**८) अवैध हातभट्‌टी दारु अडड्यांवर धाडी . :--**

दिनांक २६/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन गोबरवाही येथे अवैध हातभट्‌टी दारु अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६० लिटर हातभट्‌टी दारु किंमती ४५२०/--रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :--**

दिनांक २६/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ त्यापैकी तीन सिटर वाहनाकरीता ०२ ईतर वाहनांवरती -- ८३ केसेस करण्यात आले आहे.

**(पोनि. एस.टी. घुसर )**
**स्थागुशा भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.